जा.क्र.कृ.आ./विप्र.२/NMOOP /मा.सू/प्र.क्र.६/ ७५०/१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल
पुणे - ४११००५, दिनांक : १८/०५/२०१७

प्रति,

१) विभागीय कृषि सह संचालक (सर्व संबंधीत)

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व संबंधीत)

विषय - राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियान (NMOOP) सन २०१७-१८
मार्गदर्शक सूचना.....

संदर्भ : १) केंद्र शासनाच्या दि. ०४ फेब्रुवारी २०१४ च्या मार्गदर्शक सुचना
२) केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. 4-1/2017 -NMOOP (Coord)/OS, दि. १०/०४/२०१७
३) केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. 6-13/2017 AAP (Coord)/ OS दि. २७/०४/२०१७
४) शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. रागते-१२१६/प्रक्र.१३२/४अे, दि. १२ /५/२०१७

राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियानाच्या (National Mission on Oilseeds and Oil Palm - **NMOOP**) मार्गदर्शक सुचना संदर्भ क्र. १ केंद्र शासनाच्या www.agricoop.nic.in या संकेतस्थळावरील Programmes & Schemes मधील National Mission on Oilseeds & Oil Palm या लिंकवर उपलब्ध आहेत. तसेच, संदर्भ क्र. ३ व ४अन्वये अनुक्रमे केंद्र व राज्य शासनाकडुन २०१७-१८ करीता राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियान अंतर्गत उपअभियान क्र. १ (गळीतधान्य) व उप अभियान क्र. ३ (वृक्षजन्य तेलबिया) करीता खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान केलेली आहे.

(रु लाख)

| अ.क्र. | उपअभियान | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | उपअभियान क्र. १ (गळीतधान्य) | ४१९२.२१ | २७९४.८२ | ६९८७.०३ |
| २ | उप अभियान क्र.३ (वृक्षजन्य तेलबिया) | ७१.७९ | ४७.८७ | ११९.६६ |
| | एकुण | ४२६४.०० | २८४२.६९ | ७१०६.६९ |

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या मंजुरीनुसार सन २०१७-१८ साठी मार्गदर्शक सुचना व जिल्हा / पिक / बाबनिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रित करण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सुचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (http://www.krishi.maharashtra.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी तालुकानिहाय लक्षांक निर्धारीत करुन क्षेत्रिय स्तरावर अभियानाची अंमलबजावणी करावी.

सोबत :- वरीलप्रमाणे

अभियान संचालक (रा.ग.ते.अ.) तथा
कृषि संचालक (वि.प्र.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : १) मा.प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) मा. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित) यांना माहीतीस्तव सविनय सादर.

पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव समादाराने अग्रेषित

१) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाबीज भवन, अकोला.
२) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, प्रभादेवी, राजन हाऊस, मुंबई.
३) क्षेत्रीय विक्री अधिकारी, हिंदुस्थान ईन्सेक्टीसाईज लिमीटेड, फ्लॅट नं २०१, दुसरा मजला, गिरीगौरव सहकारी संस्था, सी-९, अंबाझरी हिलटॉप, रामनगर, नागपूर ४४० ०१०.
४) क्षेत्रीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बियाणे महामंडळ (NSC), ६८१-६९०, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
५) व्यवस्थापकीय संचालक, एस.एफ.ए.सी., कृषि भवन, पुणे - ५.
६) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, ५८३/बी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या, मार्केट यार्ड, गुलटेकडी पुणे-३७
७) कृषि उपसंचालक, मृद चाचणी प्रयोगशाळा, कृषि भवन, पुणे - ५

वाचा : १. केंद्र शासनाच्या सदर अभियानाबाबत कार्यकारी मार्गदर्शक सुचना दि.०४ फेब्रुवारी२०१४ *(www.nmoop.gov.in)*

२. शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र.सुकृऔ-*२०१६*/प्र.क्र.३०१/११-अे, दि.२१.१.२०१७.

३. शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. *०३१७*/प्र.क्र. *१८*/राकृवियो कक्ष,दि.१३.४.२०१७.

४. शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. संकिर्ण-*२०१७*/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९.४.२०१७.

५. आयुक्तालयाचे महत्वाचे पत्र जा.क्र.कृ.सं.वि.प्र. कक्ष/उ.शे.स.शे./प्रा.मा.सू- *१७*/प्र.क्र.१/ ६२/१७, दि.२७/४/२०१७

६ . शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र.सुकृऔ-*२०१६*/प्र.क्र.३०१/११-अे, दि.२८.४ .२०१७.

७ . आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. सां-७ / उ.शे.स.शे / १७-१८ /३९/२०१७, दि. ६/५/२०१७

८ . आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.कृ.सं.वि.प्र. कक्ष/उ.शे.स.शे./प्रशि.मा.सू- *१७*/प्र.क्र.१/२६८/१७, दि.१२/५/२०१७

९ . शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. रागते-१२१६/प्रक्र.१३२/ ४अे, दि. १२ /५/२०१७

## सन २०१७-१८ : राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियान

*(National Mission on Oilseeds and Oil Palm - **NMOOP**)*

---

## मार्गदर्शक सुचना

प्रस्तावना :

सन २०१४-१५ पासुन केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियानाची (National Mission on Oilseeds and Oil Palm - **NMOOP**) राज्यात अंमलबजावणी करण्यात येत असून अभियानाच्या कार्यकारी मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाच्या *(www.nmoop.gov.in)* संकेतस्थळावर व कृषी विभागाच्या *(http://www.krishi.maharashtra.gov.in)* संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याबाबत संदर्भीय मार्गदर्शक सुचना, शासन निर्णय व पत्रांचे कृपया अवलोकन करावे.

सन २०१७-१८ मध्ये सदर अभियानांतर्गत राज्यात खालील दोन उपअभियानांची अंमलबजावणी करावयाची आहे,

उपअभियान क्र. *१* - गळीतधान्य पिके : या उपअभियानात सोयाबीन, भुईमुग, करडई व तीळ या प्रमुख गळीतधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादकता वृध्दीचा अंतर्भाव आहे. पायाभूत बियाणे उत्पादनासाठी मुलभूत बियाणे खरेदीची प्रतिपूर्ती, पायाभूत व प्रमाणित बियाणे उत्पादन, प्रमाणित बियाणे पुरवठा, तंत्रज्ञान प्रसार, अनुदानीत कृषि निविष्ठा उपलब्धता, अनुदानीत सुधारीत कृषि औजारे व सिंचन सुविधा उपलब्धता व फ्लेक्झी फंड या घटकांचा समावेश आहे.

उपअभियान क्र. *३* - वृक्षजन्य तेलबिया पिके : यात करंज, महुआ व कोकम या वृक्षजन्य तेलबिया पिकांचा समावेश असून सदर पीकांच्या क्षेत्रवृध्दीसाठी पाणलोट व पडीक क्षेत्रावर लागवड व तद्नंतर देखभाल करणे अपेक्षीत आहे. उपअभियानांतर्गत क्षेत्रविस्तार, रोपवाटीका निर्मीती, लागवडीनंतर दुस-या वर्षापासुन फळधारणेपर्यंत देखभाल व प्रशिक्षण बाबींचा समावेश आहे.

राज्यस्तरीय स्थायी समिती *(State Level Standing Committee)* :

अभियान अंमलबजावणीसाठी शासन निर्णय दि. ४/४/२०१४ अन्वये मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांच्या अध्यक्षतेखाली **राज्यस्तरीय स्थायी समिती** गठीत करण्यात आली आहे.

**समितीची कार्यकक्षा:** राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखडयास मंजुरी देणे, अभियान अंमलबजावणीच्या अनुषंगाने आढावा घेणे व मार्गदर्शन करणे, आवश्यकतेप्रमाणे बाबबदलास मंजुरी देणे.

राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियानातंर्गत उपअभियान व घटकनिहाय कार्यक्रम पुढील तक्त्यात दर्शविला आहे.